## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.४१३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०५/२०१७

**१) घरात घुसुन मतिमंद अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची पिडीत मंतिमंद व अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष, ही घरी एकटी असल्याचे पाहुण यातील आरोपी हा फिर्यादीचे घरात घुसुन पिडीताचे अंगाला जबरीने पकडुन तिचा विनयभंग केला व फिर्यादीच्या उजव्या हाताला व उजव्या डोळयाला खरचटला मार लागला असुन फिर्यादी ही घटना ठिकाणी पोहचुन आरोपीला हटकताच तो पळाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४(अ),(२)४५१,३२३ भांदवि. सहकलम १० लैगिंक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि. २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लाखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) शेतातुन मोटार पंप, पाईप व रस्याची चोरी . :–**

दिनांक २६/०५/२०१७ चे २२.०० ते २७/०५/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मंगेश गोविंदा सार्वे वय ३५ वर्ष, रा. गुंथारा याने शेतात बोरवेल मध्ये लावलेली टेक्स्मो कंपनीची ३.१५ एचपीची समरर्सिबल मोटार पंप वापरात असलेली किंमती १०,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन विद्युत मोटार पंपाचा पाईप व रस्सा कापुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) शेतातील मोटार पंपला लावलेला केबल वायरची चोरी . :–**

दिनांक २६/०५/२०१७ चे १९.०५ ते २७/०५/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी शंकर देवाजी खराबे वय ५४ वर्ष, रा. दिघोरी मोठी याने शेतात मोटारपंपला ईलेक्ट्रीक पोल पर्यत लावलेला सुप्रीम कंपनीचा ४०० फुट केबल वायर किंमती १०,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. दिघोरी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) एसटी बस मध्ये चढत असता महिलेच्या हॅन्ड बॅग मधुन सोन्याचे दागीन्याची चोरी . :–**

दिनांक २६/०५/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजीव लक्ष्मण मेश्राम वय ४९ वर्ष, रा. चिचोली पो. स्टे आंधळगाव याची पत्नी सौ. जयश्री राजीव मेश्राम वय ३८ वर्ष, रा. चिचोली ही आपले मुली सोबत लग्न कार्याकरीता चिचोली वरुन पेंढरी सोनेगाव येथे जाण्या करीता भंडारा बस स्थानक येथे एसटी बस वडसा मासळ मार्गे जाणाऱ्या बस मध्ये चढत असता कोणीतरी अज्ञात चोराने हॅन्ड बॅग मध्ये ठेवलेला १ सोन्याचा पदक ५ ग्रॅम, सोन्याचे पिटीव मनी १५ ग्रॅम, काळी पोथ ज्यात १ सोन्याचा डोरला व १४ सोन्याचे मनी वजन २ ग्रॅम, १ सोन्याचा पदक, असलेली काळी पोथ वजन ५ ग्रॅम, असा एकुण ६१,४००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी चालकांच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २७/०५/२०१७ चे १६.३० पर्यत यातील मृतक चैतराम दयाराम शहारे वय ८० वर्ष, रा. खैरलांजी हा सिहोरा येथुन आठवडी बाजार करुन पायीपायी स्वगावी जात असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील चार चाकी वाहन भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मृतकला धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मोरेश्वर चेतराम शहारे वय ४५ वर्ष, रा. चिोली जिल्हा बालाघाट यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. सिहोरा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

६) बोलेरो पिकप गाडीचालकांच्या निष्काळजीपणामुळे दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २१/०५/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील जखमी रुतिक भावुराव नंदुरकार वय १४ वर्ष रा. हिंगनघाट हा आपली मावशी प्राची दिपक उकसे हिचे सह मेंढेगाव वरुन भुयार ला सायकलने आपले डावे बाजुने येत असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन जखमीचे सायकला धडक दिल्याने जखमी रुतिक व प्राची यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी श्रीधर लहु नागपुरे वय २९ वर्ष, रा. भुयार तंटामुक्ती अध्यक्ष यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम २७९,३७७ भांदवि. सहकलम १८४,१३४,१९७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

७) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २७/०५/२०१७ चे ०७.३० वा. दर. यातील मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/एस ३५१० चा चालक जखमी फिर्यादी हा सातोना कडुन येणाऱ्या यातील आरोपी मारोती कार चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकला धडक मारुन फिर्यादीस गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी चे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

८) संगनमत करुन कॉलमचे खोदकाम केल्याचे कारणावरुन डोक्यावर फावडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०५/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी आरीफ मजीद खान वय ४५ वर्ष, रा. गोबरवाही याचे आठ फुट जागेत आरोपीतांनी कॉलमचे खोदकाम केल्याने फिर्यादीने दोन्ही आरोपीतांना हि जागा माझी आहे म्हटले असता आरोपीतांनी भांडण करुन आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीचे डोक्यावर फावडयाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

९) अनोळखी इसमाचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक २७/०५/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील अनोळखी मृतक वय अंदाजे ७० वर्ष, हा दिनांक २५/०५/२०१७ ला बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे वार्ड क्र. ०९ मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुंडे पोलीस स्टेशन भंडार हे करीत आहेत.

१०) गळफास लावुन महिलेचा मृत्यु . :—

दिनांक २६/०५/२०१७ चे २३.१५ वा. दर. यातील मृतक सौ. प्रविणा राजेश्वर हर्षे वय ४० वर्ष, रा. न्यु फेन्डस कॉलोनी भंडारा याने आपले स्वत:चे घरी बेडरुम मध्ये असलेल्या सिलींगला असलेल्या पंख्याच्या हुकाला ओढनी बांधुन स्वत: गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी राजेश्वरी श्रावणजी हर्षे वय ४३ रा. न्यु कॉलोनी न्यु फ्रेन्डस कॉलोनी खात रोड भंडारा यांचे तोंडी व डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पोलीस स्टेशन भंडार हे करीत आहेत.

११) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—

दिनांक २७/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा व कारधा येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४४ लिटर हातभट्टी दारु किंमती ४,२००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २७/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

28-5

(के.एम.हत्तीमारे)
सपोनी. जिवीशा भंडारा
दुरध्वनी.क्र८६६८६९५६३५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.